तक्रार क्र. 116

# ठाणे महानगरपालिका

महानगरपालिका भवन, सरसेनानी जनरल अरुण कुमार वैद्य मार्ग, चंदनवाडी, पांचपाखाडी, ठाणे- 400602.

**THE MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF THANE**

दिनांक :०४.०३.२०२०

ठामपा/प्रनिक/ ९४२ / १८-१९

**प्रति,**

**मा. सदस्य सचिव,**

कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती तथा

उपवनसरंक्षक कांदळवन कक्ष, मुंबई.

**विषय :** कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समितीच्या बैठकीमध्ये प्राप्त झालेल्या तक्रारीबाबत...

**संदर्भ :** पत्र जा.क्र. कक्ष-१/ल.ले/११९/सन १९-२० दि. ११.०२.२०२०.

उपरोक्त विषयान्वये खालीलप्रमाणे केलेल्या कार्यवाहीची माहिती देण्यात येत आहे.

| अनु.क्र. | मुद्दा | |
|---|---|---|
| २ | श्री.जयेश गुप्ता<br>दि.२४.११.२०१८ Destroying mangroves in the CRZ Creek ara of Sabe-Desai-Khardi Gaon, Thane.<br>तक्रार क्र. ९. | या तक्रारी संदर्भात ठाणे महानगरपालिकेकडून दिवा डंपिंग ग्राऊंडचे शास्त्रीय दृष्ट्या Closure करण्यासाठी निविदा प्रक्रीया सुरु आहे. सदर बहुतंशी जागा खाजगी असल्याने ठामपा ने 37(A) अंतर्गत जागेचे Urban Forestry म्हणून आरक्षित करण्याची प्रक्रिया सुरु केलेली आहे. त्याबाबत मा. महासभेचा ठराव पारित झालेला आहे. ठाणे महानगरपालिकेने E.O.I. मागवून तज्ञांची निवड केलेली आहे व दिवा खर्डी येथील डंपिग ग्राऊड शास्त्रोक्त पध्दतीने Bio Remediation And Biomining पध्दतीने Colsure करण्यासाठी निविदा मागविलेली आहे.<br>तरी सदर तक्रार निकाली काढावी हि विनंती. |
| ६१ | श्री.सुनील अगरवाल<br>दि.०४.१२.२०२० Mangrove and wetlands destruction near Hiranandani Estate Thane. | सदर प्रकरणी तहसिलदार यांच्या समवेत पाहणी केली व पाहणी अहवाल तहसिलदार यांना सादर केला. अहवाल प्रत सोबत जोडलेली आहे. त्या अनूषंगाने खालील प्रमाणे निरीक्षणे नोंदवली आहेत.<br>**स्थळ क्र.१** कासारवडवली- सदर जागा पाणथळ असून मोठ्या प्रमाणात अवैधरित्या C & D वेस्ट ची भरणी झाली आहे असे तक्रार दाराचे म्हणणे आहे परंत सदर जागा पाणथळ म्हणून अधिसुचित झालेली नाही. C & D वेस्ट बाबत SWM 2016 नियमानुसार ठामपा तर्फे कार्यवाही करण्यात येईल. तसेच कचऱ्याचा भराव केलेल्या ठिकाणा पासून १ ते १.५ किलो मीटर अंतरावर कांदळवन क्षेत्र आहे. तरी कांदळवनाचे कोणतेही नुकसान झालेले नाही.<br>**स्थळ क्र.२** कोलशेत- सदर स्थळी Gabbian Wall (Ecofriendly Strecture) तयार करण्याचे काम सुरु होते. येथील वॉटर फ्रँट च्या कामासाठी ठाणे महानगरपालिकेने शासनाच्या सर्व मंजुऱ्या प्राप्त केल्या आहेत. कांदळवनाचे कुठलेही नुकसान झालेले नाही.<br>तरी सदर तक्रार निकाली काढावी हि विनंती. |

**मनिषा प्रधान**
**प्रदूषण नियंत्रण अधिकारी**
ठाणे महानगरपालिका, ठाणे



Scanned with CamScanner

दुरध्वनी : २५३६२९१६

# ठाणे महानगरपालिका

महानगरपालिका भवन, सरसेनानी जनरल अरुण कुमार वैद्य मार्ग, चंदनवाडी, पांचपाखाडी, ठाणे- 400602.

THE MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF THANE

ठामपा/प्रनिक/९३१ /१९-२० दिनांक : ०३.०३.२०२०

प्रति,
मा. तहसिलदार.
ठाणे.

विषय — कांदळवनाच्या ऱ्हासाच्या तक्रारीचे निराकरण करणेबाबत....

संदर्भ — १. मा. कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती यांचेकडील प्राप्त तक्रार श्री सुनील अगरवाल तक्रार क्र. ११६.

२. तहसीलदार व कार्यकारी दंडाधिकारी , ठाणे यांचे पत्र क्र. महसुल/क-१/२- २/जमीनवाळ/कवि-१७०२/२०/६४९ दि.१७.०२.२०२०.

उपरोक्त विषयान्वये दिनांक २४.०२.२०२० रोजी पहाणी केली. पहाणीच्या वेळी तक्रारदारातर्फे श्री. रोहित जोशी उपस्थित होते.

**स्थळ क्र.१** कासारवडवली - सोबत फोटो जोडलेले आहेत.

तक्रारदाराचे म्हणणे आहे की सदर जागा पाणथळ असून मोठ्या प्रमाणत अवैधरित्या C&D वेस्ट ची भरणी झालेली आहे. प्रत्यक्ष स्थळी ठाणे महानगरपालिका तर्फे DP रोड चे काम सुरु आहे. ठाणे महानगरपालिका कडे सदर जागा पाणथळ म्हणून सुचित झाल्या असल्याबाबत कोणतेही माहिती प्राप्त झालेली नाही. C&D वेस्ट अवैधरित्या भरणी झाल्याबावत ठाणे महानगरपालिका तर्फे कारवाई करण्यात येईल. सदर जागा पाणथळ म्हणून अधिसुचना झाली नसल्याने सदर तक्रार कृपया निकाली काढावी.

**स्थळ क्र.२** कावेसर तलाव - सोबत फोटो जोडले आहेत.

उपरोक्त विषयान्वये कावेसर तलावाची पाहणी केली. तक्रारदाराचे म्हणणे होते की, तलाव बुजवला गेला आहे. त्याबावत ठाणे महानगरपालिकाने नमुद केले की सदर तलाव हा TILR च्या नकाशाप्रमाणे अस्तीत्वात आहे व तलाव परिसराचे सुशोभिकरण हे Hiranandani Devlopers यांच्या तर्फे Townsheep अंतर्गत होत आहे. तरी सदर तक्रार निकाली काढावी. हि विंनती.

**स्थळ क्र.३** <u>कोलशत</u> - सोबत फोटो जोडले आहेत. :- तक्रार क्र. १०१.

उपरोक्त विषयान्वये कोलशेत वॉटर फ्रंट येथे पहाणी केली. सदर जागा बफर झोन असुन, चालु असलेले काम मंजुरी प्रमाणे होत नसल्याचे तक्रार दाराचे म्हणणे आहे. सदर प्रकरणी प्रत्यक्ष स्थळी Gabbian Wall of ( Ecofriendly Strecture) तयार करण्याचे काम सुरु होते. सदर कोलशेत येथील वॉटर फ्रंट च्या कामासाठी ठाणे महानगरपालिकेच्या सर्व मंजुऱ्या प्राप्त केल्या आहेत असे ठाणे महानगरपालिका तर्फे सांगण्यात आले असून. सदर तक्रार निकाली काढावी. हि विनंती.

04/03/2020
अवक जावक लिपीक
तहसीलदार कार्यालय, ठाणे

मनिषा प्रधान
प्रदूषण नियंत्रण अधिकारी
ठाणे महानगरपालिका, ठाणे

**प्रत सादर.**
मा. अतिरिक्त आयुक्त (२) सो.
मा. उपायुक्त सो. (प्र.नि.क.)

O/C

Scanned with CamScanner